राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक - इएसटी-५५९२/७४८/९२/प्रशा-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक - २० एप्रिल, १९९२.

पहा :- १] शासन निर्णय क्रमांक-एमआयएस-११८९/[३७/८९]/माशि-८,
दिनांक २२ ऑक्टोबर १९९०.

२] शासन निर्णय क्रमांक-एमआयएस-१०९१/५९३९/संस्कृती-१,
दिनांक २७ नोव्हेंबर, १९९१.

<u>शासन निर्णय</u> :- मराठी भाषा उच्चाधिकार समितीची पहिली बैठक दिनांक १८ नोव्हेंबर १९९१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झाली. या बैठकीत राज्य मराठी विकास संस्थेची स्थापना करण्यात यावी, व तिचे कार्य दिनांक १ मे, १९९२ रोजी सुरु व्हावे असे ठरले. संकल्पित राज्य मराठी विकास संस्थेचा आराखडा तयार करण्याकरिता प्रा.वसंत बापट यांच्या अध्यक्षतेखाली एका सुकाणू समितीची नियुक्ती करण्यात आली. सुकाणू समितीचा अहवाल प्रा.वसंत बापट यांनी दिनांक ११ मार्च, १९९२ रोजी मा.मुख्यमंत्री यांना सादर केला.

२. सुकाणू समितीच्या अहवालावर विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, राज्य मराठी विकास संस्था दिनांक १ मे, १९९२ पासून स्थापन करण्यात यावी. या संस्थेसाठी कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत तिचे कार्यालय एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल, धोबीतलाव, ३, महापालिका मार्ग, मुंबई या इमारतीत असेल.

३. दिनांक १ मे, १९९२ ते ३० एप्रिल १९९३ या कालावधीकरिता या संस्थेसाठी जागा निश्चित करणे, जागा मिळविणे, बांधकामाचे आराखडे तयार करुन घेणे, संस्थेची संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी करणे, संस्थेसाठी फर्निचर आणि साहित्य खरेदी करण्याच्या दृष्टीने तयारी करणे, संचालक व इतर पदे भरण्यासाठी पूर्वतयारी करणे, १९९२-९३ साठी संस्थेच्या खर्चाकरिता अंदाजपत्रकात तरतूद करण्यास शासनाची मान्यता मिळविणे, इत्यादी कामांसाठी शिक्षण व सेवायोजन विभागात रु.३५००-५०० या वेतनश्रेणीत-

उपसचिवांच्या दर्जाचे विशेष कार्य अधिकारी हे एक पद शिक्षण विभागात दिनांक १ मे १९९२ ते ३० एप्रिल, १९९३ या कालावधीसाठी निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

४. विशेष कार्य अधिकारी हे मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या नियामक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. नियामक मंडळाची रचना पुढीलप्रमाणे असेल :-

| | | |
|---|---|---|
| मा.मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| मा.शिक्षणमंत्री | - | उपाध्यक्ष. |

<u>अशासकीय सदस्य</u>

१. श्री.तात्यासाहेब उर्फ वि.वा.शिरवाडकर,
तरुण तलावाशेजारी, पटेल कॉलनी,
नाशिक - १.

२. डॉ.वि.भि.कोलते,
५६५, जुनी रामदास पेठ,
नागपूर - १०.

३. प्रा.वसंत बापट,
१, शेफाली, आय.सी.एस.एस.कॉलनी,
गणेशखिंड, पुणे.

४. प्रा.गंगाधर पानतावणे,
३७, लक्ष्मी कॉलनी, "छावणी",
औरंगाबाद.

५. प्रा.के.ज.पुरोहित,
५, अभंग, साहित्य सहवास,
वांद्रे [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

६. डॉ.सरोजिनी वैद्य,
आफ्रिका हाऊस, एडनवाला रोड,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.

७. डॉ.अशोक रा.केळकर,
३, [illegible], ७५१/८३, भांडारकर रस्ता,
पुणे - [illegible] ००४.

८. श्री. माधव गडकरी,
जे-१५, नवभारत सोसायटी,
हनुमान मार्ग, विलेपार्ले [पूर्व]
मुंबई – ४०० ०५७.

९. डॉ. सरोजिनी बाबर,
"जवाहर" ११८६, विजयनगर कॉलनी,
पुणे – ४११ ०३०.

१०. प्रा. यशवंत मनोहर,
अ-२, विद्यापीठ प्राध्यापक निवास,
अमरावती मार्ग, नागपूर – १०.

११. डॉ. आनंद यादव
भूमी, ५-कलानगर,
धनकवडी, पुणे – ४११ ०४३.

१२. फादर फ्रान्सिस दिब्रिटो
संपादक "सुवार्ता" सिरीज,
वसई, जिल्हा ठाणे.

## शासकीय सदस्य

१. सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण.

२. भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. संचालक, आदिवासी संशोधन व विकास संस्था, पुणे.

राज्य मराठी विकास संस्थेचे विशेष कार्य अधिकारी हे नियामक मंडळाचे पदसिध्द सदस्य-सचिव असतील.

५. उच्चाधिकार समितीच्या अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्ता मुंबई नागरी सेवा नियम खंड २ मधील परिशिष्ट ४२[अ] यातील सेक्शन १ मधील १[१][बी] च्या तरतुदीनुसार व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-टीआरए १४७७/१०३२-सी/एसईआर-५, दिनांक २३.९.१९७७ व क्रमांक-टीआरए-१०८३/१४२६/एसईआर-५, दिनांक १.२.१९८४ च्या आधारे नियमित केला जावा. तसेच ते ज्यावेळी प्रवासभत्ता मिळण्यास पात्र राहणार नाहीत, त्यावेळी ते प्रत्येक सभेत उपस्थित राहण्यासाठी नियमाप्रमाणे प्रत्यक्ष प्रवास खर्च मिळण्यास पात्र

राहतील. सदस्यांना विमान प्रवास तसेच रेल्वेच्या वातानुकूलीत प्रथम वर्गाने प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

६. अशासकीय सदस्यांच्या प्रवास भत्त्याच्या व दैनंदिन भत्त्याच्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय यांना प्रदान करण्यात येत आहेत.

७. राज्य मराठी विकास संस्थेच्या नियामक मंडळाच्या अशासकीय सदस्यांचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता यावरील खर्च नियामक मंडळाच्या बैठकांसाठी होणारा खर्च आणि विशेष कार्य अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च मागणी क्र.इ-९, २२५१, सेक्रेटेरिएट-सामाजिक सेवा-०९०, सेक्रेटेरिएट [एक][ए] शिक्षण विभाग या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात यावा.

हा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.सीआर-२२२५/पीएसएफ, दिनांक २७.४.९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ वि.ल. पातरपेकर ]
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति-

राज्यपालांचे सचिव

मुख्यमंत्र्यांचे सचिव

मुख्य सचिव

सचिव [तंत्र व उच्च शिक्षण], शिक्षण व सेवायोजन विभाग

सचिव [सामान्य शिक्षण], शिक्षण व सेवायोजन विभाग

सचिव, सामान्य प्रशासन विभाग

सचिव, विधि व न्याय विभाग

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालक [उच्च शिक्षण] महाराष्ट्र राज्य, पुणे.

शिक्षण संचालक [प्रौढ शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे

..५../..

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे -३०
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -१०
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे -४
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आदिवासी संशोधन व विकास संस्था, पुणे.
विशेष कार्य अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.
संचालक, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन, राजभवन कॉम्प्लेक्स, पुणे.
सर्व अशासकीय सदस्य [पत्राने]
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
शिक्षण व सेवायोजन विभागातील सर्व उपसचिव.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], महाराष्ट्र-१, मुंबई, महाराष्ट्र-२, नागपूर.
महालेखापाल [लेखा परीक्षा], महाराष्ट्र-१, मुंबई, महाराष्ट्र-२, नागपूर.
कोषाधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/सातारा/नाशिक/यवतमाळ
वित्त विभाग [सेवा - ५]
प्रत निवड नस्ती, कार्यासन संस्कृती-१
प्रत निवड नस्ती कार्यासन प्रशा-१.

एसएसएस.
८.५.